# -:प्रेस नोट:-

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंध विभाग/घटक | चंद्रपूर |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक व कलम | पो. स्टे. बल्लारशाह अप. क्र. १९६/२४ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारीत सन २०१८) |
| ३ | आरोपीचे संपुर्ण नाव, पद व नेमणुकीचे ठिकाण | शार्लेद्र देवराव चांदेकर वय ४४ वर्ष नोकरी - वरीष्ठ तंत्रज्ञ, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्या. कार्यालय विरुर स्टे. (डी.सी.) ता. राजूरा जि. चंद्रपूर |
| ४ | आरोपीचे खाते व वर्ग | महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी वर्ग - ४ |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | प्रत्येकी १५००/- रू. असे एकूण ७५००/- रू. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती ५,०००/- रू. |
| ७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार हे मौजा नवेगावं, ता. राजुरा येथील रहीवासी असुन शेती हा व्यवसाय करतात. तक्रारदार यांची मौजा केळझर येथे शेती असुन शेतात पाणीपुरवठा करण्यासाठी विद्युत पंपाची सोय करण्यात आलेली असुन सदर पंप सुरू करण्यासाठी थ्री फेज विद्युत पुरवठा सुरू असणे आवश्यक असते. तक्रारदाराप्रमाणे गावातील ईतर शेतकऱ्यांकडे विद्युत पंपाची सुविधा आहे. तक्रारदार व ईतर शेतकऱ्यांचे शेत विरूर (स्टे.) येथील एम.एस.सी.बी. कार्यालय अंतर्गत येत असुन शेतातील विद्युत पुरवठा सुरळीत सुरु ठेवण्याचे काम आरोपीत लोकसेवक यांचेकडे आहे. आरोपीत लोकसेवक हे प्रत्येक वेळी विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यावरून पैशाची मागणी करून तक्रारदार व ईतर शेतकऱ्यांना सतत त्रास देत असतात. आरोपीत लोकसेवक यांनी मागील तीन दिवसांपासून केळझर परिसरातील तक्रारदार व ईतर शेतकऱ्यांचे शेतातील विद्युत पुरवठा बंद करून ठेवला. याबाबत तक्रारदार यांनी आरोपीत लोकसेवक यांचेसोबत मोबाईलवर बोलणी केली असता विद्युत पुरवठा पूर्ववत सुरु करायचा असेल तर प्रत्येकी २० किलो तांदूळ किंवा प्रत्येकी १,५००/- रू. असे एकुण ७,५००/-रू. आरोपीत लोकसेवक यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. चंद्रपूर येथे तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीवरून दिनांक १६/०२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपीत लोकसेवक <u>शार्लेद्र देवराव चांदेकर, वरिष्ठ तंत्रज्ञ, विरुर (डि. सी.), उपविभाग राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर</u> यांनी तक्रारदार यांना तडजोडीअंती ५,०००/-रु. लाचेची मागणी करून तक्रारदाराकडून ५,०००/-रू. लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील तपास कार्य सुरु आहे. |
| ८ | सापळा पथक | सदरची कार्यवाही ही श्री. राहुल माकणीकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर तसेच पोलीस उप अधीक्षक श्रीमती मंजुषा भोसले, ला.प्र.वि. चंद्रपूर, तसेच कार्यालयीन स्टाफ पो.हवा. हिवराज नेवारे, नरेशकुमार नन्नावरे, ना.पो.अं. रोशन चांदेकर, पो.अं. प्रदिप ताडाम, म.पो.अं. मेघा मोहुर्ले, पुष्पा काचोळे व चापोशि सतिश सिडाम यांनी यशस्वी पार पाडली आहे. |
| ९ | तपास अधिकारी | श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर |

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की,त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

- **श्री. राहुल माकणीकर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर,**
  **श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर**
  **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर०७१२-२५६१५२०**
- **श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर-९३२२२५३३७२**
  **श्री. प्रशांत पाटील, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर-९१३०५५६१६१**
  **श्री.जितेंद्र गुरनुले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर-८८८८८५७१८४**
- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक -०७१७२-२५०२५१**
- **टोल फ्रि क्रमांक - १०६४**

**Website: <u>www.acbmaharashtra.gov.in</u>**

मंजुषा म. भोसले
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर